साईमत



# सायबर सेक्युरिटी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकडून जनजागृती

**जळगाव । प्रतिनिधी**

कवयित्री बहिणाबाई चौधरी विद्यापीठातील सायबर सेक्युरिटी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी विशाखा शिंदे, श्रद्धा अहिरराव ह्या विद्यार्थिनींनी जळगाव शहरात जिल्हा पेठ पोलीस स्टेशन तसेच भास्कर मार्केट परिसर भागात सायबर सुरक्षेच्याबाबतीत उदाहरणे देऊन मार्गदर्शन केले. त्याचबरोबर जनजागृतीपर मार्गदर्शनही केले.

सायबर गुन्ह्यापासून स्वतःला सुरक्षित कसे ठेवावे, याबाबत अत्यंत महत्त्वाची माहिती पोलीस स्टेशनमधील कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्यांना तसेच जनतेलाही देण्यात आली. याप्रसंगी जिल्हा पेठ पोलीस स्टेशन येथील स्टाफ, भास्कर मार्केट परिसरातील जनतेनेही आपल्या शंकेचे समाधान करून सर्व माहिती जाणून घेतली.

Jalgaon Edition
Jul 23, 2025 Page No. 7
Powered by: erelego.com